ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ६२ • शनिवार दि.२८ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# डिलिमिटेशनवरुन इंडिया आघाडीत मतभेद; संयुक्त विरोधाचा निर्धार



## पवारांची राष्ट्रवादी व डीएमकेची गैरहजेरी, तीन मागण्या

नवी दिल्ली:केंद्र सरकारच्या डिलिमिटेशन (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयकावरून राजकीय वातावरण तापले असताना इंडिया आघाडीच्या नेत्यांनी शनिवारी (२८ नोव्हेंबर) काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी महत्त्वपूर्ण बैठक घेतली. संसदेच्या आगामी विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी विरोधी पक्षांनी संयुक्त रणनीती आखली. मात्र, या बैठकीत महाराष्ट्रातील दोन प्रमुख मित्रपक्षांच्या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

या बैठकीला काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, मल्लिकार्जुन खरगे, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी आणि डेरेक ओब्रायन यांच्यासह विविध विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. कम्युनिस्ट पक्षांकडून सीपीआय (एम) चे ए. रहीम आणि सीपीआयचे खा.पी. संतोश कुमार सहभागी झाले. रिव्होल्युशनरी सोशलिस्ट पार्टीचे खा. एन. के. प्रेमचंद्रन, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दलाचे प्रतिनिधीही बैठकीला उपस्थित होते. महाराष्ट्रातून शिवसेना ठाकरे पक्षाचे खा.अरविंद सावंत यांनी बैठकीला उपस्थिती लावली. मात्र, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही खासदार बैठकीला उपस्थित नव्हता. पक्षाच्या कार्याध्यक्ष आणि खा.सुप्रिया सुळे यांनी वडील शरद पवार यांची प्रकृती ठीक नसल्याने मुंबईत थांबण्याचा निर्णय घेतला होता. शरद पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने पक्षाच्या उपस्थितीबाबतही अनिश्चितता निर्माण झाली होती. अखेर पक्षाचा एकही खासदार या बैठकीत सहभागी झाला नाही. विशेष म्हणजे, डिलिमिटेशन विधेयकाला शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सशर्त पाठिंबा दर्शविल्याने इंडिया आघाडीतील मतभेद उघड झाले आहेत. सर्व राज्यांमध्ये लोकसभेच्या जागांमध्ये समान ५० टक्के वाढ केली जाणार असेल, तर विधेयकाला पाठिंबा देण्याची भूमिका पक्षाने मांडली आहे. त्यामुळे काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांच्या भूमिकेपेक्षा पवारांच्या राष्ट्रवादीची भूमिका वेगळी ठरली आहे. बैठकीत विरोधकांनी लोकसभेचे सध्याचे ५४३ जागांचे संख्याबळ कायम ठेवावे, महिला आरक्षणाची अंमलबजावणी विद्यमान जागांमध्येच करावी आणि पुढील २५ वर्षे राज्यनिहाय लोकसभा मतदारसंघांचे प्रमाण बदलू नये, अशा प्रमुख मागण्या मांडल्या. पान ४ वर

# एमपीडीए अंतर्गत चार सराईत गुन्हेगार एका वर्षासाठी स्थानबद्ध

## दिडशेहून अधिक गुन्हेगार पोलीसांच्या रडारवर

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या नेतृत्वाखाली विशेष टू प्लस योजने अंतर्गत सराईत गुन्हेगारांवर कारवाईचे सत्र सुरु केले आहे. गंभीर गुन्हे करणाऱ्या चार गुन्हेगारांना एमपीडीए अंतर्गत एका वर्षासाठी स्थानबध्द करण्यात आले असून त्यांची रवानगी संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे.

गंगाधर उर्फ सोनु विद्यासागर जोंधळे (वय २९) रा.वजिराबाद, रामा मरीबा देवकर (वय २८) रा. खोब्रागडेनगर, अरविंद आनंदराव तारु (वय ३३) व करण आनंदराव तारु (वय ३०) दोघे रा.वाजेगाव, नांदेड या चारही आरोपींविरुध्द खुनाचा प्रयत्न, खंडणी, अवैधरित्या शस्त्र बाळगणे, दरोडा व इतर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलीसांनी चारही आरोपींविरुध्द अनेकवेळा प्रतिबंधात्मक कारवाई केली. परंतु त्यांच्या वर्तुवणुकीत सुधारणा झाली नाही. पोलीसांनी चारही आरोपींविरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार करुन पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्याकडे पाठविला होता. पोलीस अधीक्षकांनी सदरील प्रस्तावातील त्रुटी व कायदेशीर बाबी व कागदपत्राची पुर्तता करुन मंजुरीसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे पाठविला. जिल्हाधिकाऱ्यांनी सदरील प्रस्तावावर मंजुरी देवून पान ४ वर

## सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जावरही कठोर निर्बंध

# अतिक्रमणे नियमित करणार-ना.बावनकुळे

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील सर्वसामान्य नागरिक, सदनिकाधारक आणि सहकारी साखर कारखान्यांसंदर्भात महसूल विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. २०११ पर्यंतची सरकारी जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याच्या प्रक्रियेला वेग देण्यात आला असून, यासाठी राज्यभरात ११५ सहअध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर शहरी भागातील फ्लॅटधारकांना डिजिटल व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुसरीकडे, सहकारी साखर कारखान्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जावर कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

राज्यातील सरकारी जमिनीवरील २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याच्या प्रक्रियेला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गती दिली आहे. यासाठी विधानसभा मतदारसंघस्तरीय आढावा समित्यांच्या ११५ सहअध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या समित्यांमुळे प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया गतिमान होणार आहे. वर्षानुवर्षे सरकारी जमिनीवर वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना घरांचा कायदेशीर मालकी हक्क मिळण्याचा मार्ग यामुळे मोकळा होण्याची अपेक्षा आहे.

शहरी भागातील सदनिकाधारकांसाठी सरकारने व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड योजना आणली आहे. जमिनीच्या सातबाऱ्याप्रमाणे प्रत्येक फ्लॅटला स्वतंत्र डिजिटल ओळख आणि मालमत्ता हक्काची नोंद देण्यात येणार आहे. या कार्डमध्ये सदनिकेवरील बँकेचे कर्ज, गहाणखत, मालमत्ता कर, सोसायटीची थकबाकी, न्यायालयीन निर्बंध आणि शासकीय देणी यांची माहिती उपलब्ध असेल. अधिकृत बांधकाम, मंजूर नकाशा आणि आवश्यक कागदपत्रे असलेल्या प्रकल्पांना हे कार्ड दिले जाणार आहे. राज्यातील अंदाजे सात कोटी सदनिकाधारकांना याचा लाभ होण्याची अपेक्षा आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या योजनेच्या नियमांचा मसुदा आज सार्वजनिक चर्चेसाठी उपलब्ध करून देण्याची माहिती दिली. हा मसुदा ३० दिवस सार्वजनिक डोमेनमध्ये ठेवण्यात येणार असून, नागरिकांच्या सूचना आणि हरकती विचारात घेऊन पुढील दोन महिन्यांत अंतिम नियमावली तयार केली जाणार आहे.

### सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जावर १०० कोटींची मर्यादा

दरम्यान, राष्ट्रीय सहकार विकास निगममार्फत सहकारी साखर कारखान्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जासाठी राज्य सरकारने कठोर निकष लागू केले आहेत. यापुढे नवीन कर्जाची कमाल मर्यादा १०० कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. कर्जासाठी कारखान्यांची मालमत्ता तारण ठेवणे बंधनकारक असेल. केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळणारे अनुदान थेट कर्जफेडीसाठी जमा करावे लागणार असून, कारखान्यांच्या उत्पादनाचे टॅगिंगही अनिवार्य करण्यात आले आहे. कर्जाचा विनियोग, थकबाकी आणि परतफेड यावर विशेष लेखापरीक्षकांची देखरेख राहणार आहे. कर्जाच्या अटींचे उल्लंघन झाल्यास मंजुरी रद्द करून संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कर्जफेडीच्या बाबतीत कारखान्यांच्या संचालकांची वैयक्तिक जबाबदारीही निश्चित केली जाणार आहे.

# पवारांच्या राष्ट्रवादीवर टीकेची झोड;अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर

## वडेट्टीवारांचा खंजीराचा वार,राऊतांचा संताप;रोहित पवारांची वेगळी भूमिका!

नवी दिल्ली:डिलिमिटेशन विधेयकाला शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा देण्याची भूमिका घेतल्याने महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीत नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. काँग्रेसचे विजय वडेट्टीवार आणि ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी पवारांवर जोरदार टीका केली असतानाच रोहित पवार यांनी वैचारिक भूमिकेवर ठाम राहण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसवर एकीकडे आरोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. तर अंतर्गत मतभेदही चव्हाट्यावर आले आहेत.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शरद पवारांच्या राजकीय भूमिकेवर टीका करताना, त्यांचा इतिहास खंजीर खुपसण्याचा असल्याचे विधान केले. वयाच्या ८५ व्या वर्षी काँग्रेसने पवारांना राज्यसभेवर पाठवले. फुले, शाहू, आंबेडकरांचा पुरोगामी विचार टिकावा, ही आमची अपेक्षा होती. मात्र, पवारांनीच तो विचार संपवण्याचा मार्ग स्वीकारला, असा आरोप त्यांनी केला. सुप्रिया सुळे यांना मंत्री व्हायचे असल्याने बाप-लेकींनी घरात बसून हा निर्णय घेतल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी केला.

संजय राऊत यांनीही पवारांच्या राष्ट्रवादीवर कठोर टीका केली. शरद पवार मोदी-शहांच्या बाजूने जात असतील, तर महाराष्ट्रातील जनता त्यांच्यावर विश्वास ठेवणार नाही. मोदी-शहांच्या बाजूने मतदान करू द्या, मग महाराष्ट्र काय आहे ते कळेल, असा इशारा त्यांनी दिला. राष्ट्रवादीच्या खासदारांनी आत्मचिंतन करावे. भाजपसोबत जाणार असाल तर अनिल देशमुख आणि नवाब मलिक यांची माफी मागा, असेही राऊत म्हणाले. डिलिमिटेशनसाठी खासदारांना १५० कोटी रुपयांची ऑफर दिल्याच्या आरोपाचाही त्यांनी पुनरुच्चार केला. हा निर्णय महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारा असल्याचे त्यांनी म्हटले.दरम्यान, राष्ट्रवादी पान ४ वर

# महापालिकेची सर्वसाधारण सभा वादळी होण्याची चिन्हे

## पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव;विरोधक आक्रमक

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता कै.शंकरराव चव्हाण सभागृहात महापौर सौ.कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. ही सभा वादळी होण्याची चिन्हे असून अनेक प्रश्नांवर आक्रमक भूमीका घेण्याची तयारी विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी घेतली आहे.



माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकुन जनतेंनी महापालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत दिले आहे. महापौरपदी सौ.कविता संतोष मुळे व उपमहापौरपदी दीपकसिंह रावत यांची निवड होवून जवळपास दहा महिन्याचा कालावधी झाला आहे. परंतु सत्ताधारी भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने अनेक प्रश्न प्रलंबित राहत आहेत. महापौरांनी शंभर दिवसाचा ठोस कार्यक्रम अंतर्गत शहरातील जनतेचे मुलभूत प्रश्न सोडविण्याचा निर्धार केला होता. परंतु दहा महिन्यात महापौरांनी किती प्रश्न सोडविण्यात आल हे अजुन तरी दिसून आलेले नाही. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक व पूर्णाकृती पुतळ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे धनगर समाजासह ओबीसी समाजात भाजपा विषयी तीव्र नाराजी पसरली. सत्ताधारी भाजप पदाधिकाऱ्यांनी पक्षाची प्रतिमा मलिन केली आहे. पुतळा बांधकामा संदर्भात सामाजिक संघटना व विरोधकाकडून आरोप केल्यानंतरही महापौरांसह कोणत्यांही पदाधिकाऱ्यांनी आरोपांचे खंडन केले नाही. अखेर खा.अशोक चव्हाण यांनीच पुढे पान ४ वर

# होय रे भाऊ! खासदारांची मजा अन् शेतकरी सर्वसामान्यांना सजा





नांदेड : पारावर बंड्याने बातमी फोडली, ''भाऊ, डिलिमिटेशन झालं तर लोकसभेत खासदार दीडपट होणार!''

भाऊच्या हातातला चहा थरथरला. ''म्हणजे ५४३ चे आठशेच्या वर? एवढी माणसं संसदेत बसणार, की गोंधळ घालायला पाळ्या लावणार? आणि यांचा खर्च कोण भरणार?''

तेवढ्यात शिवा शेतकरी कपाळावरचा घाम पुसत आला. ''आमची कर्जमाफी म्हटलं की साहेब म्हणतात, 'सरकारी तिजोरीवर बोजा पडेल!' पीक पाण्यात गेलं, भाव मातीत गेला, पण बोजा आमचाच?''

''होय रे भाऊ!'' भाऊ म्हणाला. ''शेतकऱ्याचं कर्ज म्हणजे तिजोरीवर बोजा आणि साहेबांचा पगार-भत्ता म्हणजे लोकशाहीतली मजा! तुझ्या कर्जमाफीला निकष, अटी, कागदपत्रं आणि रांग. साहेबांचा भत्ता मात्र न चुकता खात्यात!''

शिवा म्हणाला, ''बँकेचा साहेब सातबारा मागतो, आठ-अ मागतो, आधार मागतो. अंगठा उमटला नाही तर म्हणतो, उद्या या. शेतात राबून बोटांवरच्या रेषाच झिजल्या, आता नशिबाच्या रेषा कुठून आणू?''

अण्णा मास्तरांनी हिशेब मांडला. ''विद्यमान खासदाराला महिन्याला १ लाख २४ हजार वेतन, शिवाय मतदारसंघ भत्ता, कार्यालय खर्च, दैनिक भत्ता, पीएचा पगार, प्रवास आणि टेलिफोनची सोय. माजी झाले तरी महिन्याला ३१ हजार पेन्शन. डोकी दीडपट झाली, की हा खर्चही फुगणार!''

बंड्या म्हणाला, ''कॅन्टीनचं स्वस्त जेवण राहिलं!''

''ते अनुदान २०२१ मध्ये बंद झालं रे,'' अण्णा म्हणाले. ''तेवढं एक ताट महाग झालं,बाकी पंगत सुरूच!''

''आणि प्रवास? ''भाऊनं डोळा मारला.'' आमची एसटी रस्त्यात बंद पडली की, प्रवासीच खाली उतरून ढकलतात.साहेबांना मात्र रेल्वेचा पहिला वर्ग आणि विमानाच्या फेऱ्या. आम्ही गावातून तालुक्याला पोचेपर्यंत साहेब दिल्लीहून परत!''

''कर्मचाऱ्यांनी पगारवाढ मागितली की तिजोरीत खडखडाट,पेन्शन मागितली की तिजोरीला कुलूप. खासदार वाढवायचे म्हटलं की मात्र खणखणाट! नोकरभरती करताना तिजोरी पाहतात आणि पैसा वाचवायला कंत्राट, आउटसोर्सिंग आणतात. मग खासदारांसाठी ही काटकसर का नाही?''

''खासदारकीही आउटसोर्स करा की! ''अण्णांचे डोळे चमकले.'' टेंडर काढा. 'देशाला आठशेहून अधिक खासदार पुरवणे. पात्रता: मोठ्यानं ओरडता येणं.' अकरा महिन्यांचा करार आणि बायोमेट्रिक हजेरी. सभागृह बंद पाडलं तर पगारकपात!''

सखू काकू म्हणाल्या, ''माझा पोरगा आउटसोर्सिंगवर आहे. महागाई बारा महिने आणि नोकरी पान ४ वर

दृष्टीक्षेप
प्रदीप नागापूरकर

# भाजपचा मास्टर स्ट्रोक आणि पवारांचा पॉवर गेम

**राजकारणात पराभव हा शेवट नसतो; अनेकदा तो पुढच्या डावाची सुरुवात असतो. केंद्रीय मंत्रिमंडळाने मतदारसंघ पुनर्रचना, म्हणजेच डिलिमिटेशन, आणि महिला आरक्षणाशी संबंधित विधेयकांना पुन्हा मंजुरी देऊन हेच दाखवून दिले आहे. एप्रिलमधील संसदेच्या अधिवेशनात सत्ताधारी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला लोकसभेत आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत जमवता आले नव्हते. २०१४ नंतर सरकारवर अशी नामुष्की क्वचितच ओढवली. त्यामुळे आता हेच विषय नव्याने संसदेत आणणे हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मास्टर स्ट्रोक असल्याची चर्चा रंगली आहे.या खेळीची पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. नीट पेपरफुटी प्रकरणावरून देशभर विद्यार्थ्यांचा संताप उसळला आणि अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. राजीनामे न देण्याचा तोरा मिरवणाऱ्या सत्ताधाऱ्यांसाठी हा मोठा धक्का होता. शेतकरी, कामगार किंवा विद्यार्थी रस्त्यावर उतरले की त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करायचे आणि आंदोलकांवर देशद्रोही, अर्बन नक्षल, पाकिस्तानी अशी लेबले चिकटवायची, अशी टीका सरकारवर सातत्याने होत आली. मात्र विद्यार्थी आंदोलनाच्या भडक्याने हे तंत्र नेहमीच चालत नाही, हे स्पष्ट झाले. सरकारची पीछेहाट होत असल्याचे चित्र निर्माण झाले. ते बदलण्यासाठी भाजपला एका मोठ्या राजकीय यशाची गरज आहे. महिला आरक्षण हा असा विषय आहे की, त्याला उघड विरोध करणे कोणत्याही पक्षाला परवडणारे नाही. परंतु खरी मेख मतदारसंघ पुनर्रचनेत आहे. महिलांना आरक्षण देण्यास पाठिंबा, पण त्याची पुनर्रचनेशी सांगड घालण्यास विरोध, अशी भूमिका एप्रिलमध्ये विरोधकांनी घेतली होती. लोकसंख्या नियंत्रणात आणणाऱ्या दक्षिणेकडील राज्यांचे संसदेतील वजन घटेल, ही त्यांची मुख्य भीती होती. सर्व राज्यांच्या जागा समान प्रमाणात वाढवल्यास कोणावरही अन्याय होणार नाही, असा सरकारचा युक्तिवाद आहे. मात्र टक्केवारी कायम राहिली तरी मोठ्या आणि लहान राज्यांतील जागांचे संख्यात्मक अंतर वाढते, हा आक्षेपही दुर्लक्षित करता येणार नाही. सरकारसाठी ही लढाई केवळ एका कायद्याची नाही, तर राजकीय प्रतिष्ठेची आहे. एप्रिलमध्ये २९८ सदस्यांनी बाजूने, तर २३० सदस्यांनी विरोधात मतदान केले होते. साधे बहुमत असूनही घटनादुरुस्ती पेटाळली गेली. हे अंतर भरून काढण्यासाठी विरोधी गोटातील काही पक्ष आपल्या बाजूला वळवणे किंवा त्यांना तटस्थ ठेवणे सरकारला आवश्यक आहे. संसदेत यश मिळाले तर महिलांना न्याय दिल्याचा दावा करता येईल; अपयश आले तर विरोधकांना महिलाविरोधी ठरवता येईल. भाजपच्या या व्यूहरचनेतील मास्टर स्ट्रोक हाच मानला जातो.या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी आता खा.शरद पवार आले आहेत. त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (शरदचंद्र पवार) पुनर्रचनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याचे आ.जितेंद्र आव्हाड यांनी जाहीर केले. मात्र कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी विधेयकाचा मसुदा पाहिल्याशिवाय निर्णय नाही, अशी भूमिका घेतली आहे. पक्ष आपली भूमिका सोमवारी लोकसभेत स्पष्ट करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. एकीकडे पाठिंब्याची घोषणा आणि दुसरीकडे सावध पवित्रा, यामुळे संभ्रम वाढला आहे. महाराष्ट्र काँग्रेसने या संभाव्य पाठिंब्यावर उघड नाराजी व्यक्त केली आहे. एप्रिलमध्ये विरोधात मतदान करणारा हा पक्ष भूमिका बदलत असेल, तर त्यामागची कारणे जनतेसमोर यायला हवीत. पुनर्रचना ही घटनात्मक प्रक्रिया असून ती करावीच लागणार, हे कारण पुढे केले जात आहे. तरीही 'आत्ताच का?' हा प्रश्न उरतोच. पवारांचे राजकारण नेहमीच अनपेक्षित वळणांचे राहिले आहे. १९७८ मध्ये पुरोगामी लोकशाही दल, म्हणजेच पुलोदचा प्रयोग करून त्यांनी मुख्यमंत्रिपद मिळवले. २०१४ मध्ये भाजपला बाहेरून पाठिंबा देऊ करत शिवसेनेची सौदेबाजीची ताकद त्यांनी कमी केली.हाती संख्याबळ मर्यादित असतानाही सत्तेच्या समीकरणात निर्णायक ठरण्याची किमया पवारांनी वारंवार साधली आहे. आजही त्यांच्या पक्षाचे लोकसभेत केवळ आठ खासदार आहेत. पण घटनादुरुस्तीच्या आकड्यांच्या खेळात प्रत्येक मत मोलाचे असते. त्यामुळेच अवघ्या देशाचे लक्ष त्यांच्या भूमिकेकडे लागले आहे.हा पाठिंबा केवळ एका विधेयकापुरता आहे, की नव्या राजकीय समीकरणांची नांदी? इंडिया आघाडीच्या ऐक्याला यामुळे तडा जाणार का? महाराष्ट्राच्या वाट्याला यातून नेमके काय येणार? या प्रश्नांची उत्तरे पवार आणि त्यांच्या पक्षाला द्यावी लागतील. सरकारनेही केवळ संख्याबळाची जुळवाजुळव न करता सर्व राज्यांच्या शंकांचे निरसन केले पाहिजे. मतदारसंघांची आखणी पुढील अनेक दशकांचे राजकारण ठरवणार आहे. त्यामुळे हा विषय कोणाच्या मास्टर स्ट्रोकचा किंवा पॉवर गेमचा न राहता व्यापक सहमतीचा व्हायला हवा. महिलांचा हक्क आणि राज्यांचा न्याय्य वाटा या दोन्हींचे रक्षण झाले, तरच तो लोकशाहीचा खरा विजय ठरेल.**



# महात्मा फुले:समतेच्या समाजक्रांतीचे अध्वर्यू..!

## शिक्षण,समता आणि विवेकाच्या विचारांनी समाजपरिवर्तनाचा पाया रचणारे क्रांतिसूर्य

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांच्या कार्याचा प्रकाश काळाच्या सीमा ओलांडून अनेक पिढ्यांना दिशा देत राहतो.क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले हे असेच एक युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व! सामाजिक विषमता, जातिभेद, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य आणि शैक्षणिक वंचिततेच्या अंधकारात समाजजीवन अडकलेले असताना त्यांनी परिवर्तनाची मशाल हाती घेतली. रूढी-परंपरांच्या नावाखाली माणसाला माणसापासून दूर करणाऱ्या व्यवस्थेला त्यांनी निर्भीडपणे प्रश्न विचारले. म्हणूनच महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर समताधिष्ठित समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहणारे आणि त्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे महान समाजक्रांतिकारक होते.

११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे जन्मलेल्या ज्योतिरावांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीतील अन्याय जवळून अनुभवला.शिक्षण हे काही विशिष्ट समाजघटकांचेच मक्तेदारीचे साधन बनले होते.स्त्रिया, शूद्र-अतिशूद्र आणि वंचित समाजाला ज्ञानाच्या प्रवाहापासून दूर ठेवले जात होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत ज्योतिरावांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे प्रभावी शस्त्र मानले.१८४८ मध्ये पुण्यात भिडे वाडा येथे मुलींसाठी शाळा सुरू करून त्यांनी भारतीय स्त्रीशिक्षणाच्या इतिहासात क्रांतिकारी पाऊल टाकले. या कार्यात त्यांच्या सहचारिणी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी खंबीर साथ दिली.समाजाचा विरोध, अपमान आणि दगडधोंड्यांचा मारा सहन करूनही या दाम्पत्याने शिक्षणाची ज्ञानज्योत विझू दिली नाही.त्यांच्या कार्यातून स्त्रीला शिक्षणाचा अधिकार आहे, हा विचार समाजमनात रुजण्यास प्रारंभ झाला. महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा केंद्रबिंदू होता माणूस आणि त्याचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार! जन्मावरून श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरवणाऱ्या व्यवस्थेला त्यांनी आव्हान दिले. जातिभेदाच्या भिंती पाडण्यासाठी त्यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्य, विवेक, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीचा त्यांचा प्रयत्न होता. धार्मिक कर्मकांड, पुरोहितशाही आणि सामाजिक शोषणाला विरोध करताना त्यांनी सामान्य माणसाला स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली.सत्यशोधक विवाहपद्धतीच्या माध्यमातून अनावश्यक खर्च आणि कर्मकांडाला पर्याय देत सामाजिक सुधारणेला व्यावहारिक दिशा दिली.महात्मा फुले यांचे कार्य केवळ स्त्रीशिक्षण किंवा जातिभेद निर्मूलनापुरते मर्यादित नव्हते. शेतकरी, कष्टकरी आणि श्रमिकांच्या प्रश्नांचीही त्यांना तीव्र जाणीव होती. शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाची, सावकारी पाशाची आणि सत्ताधाऱ्यांच्या उदासीनतेची त्यांनी परखड चिकित्सा केली. त्यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातून ग्रामीण समाजाचे वास्तव आणि शेतकऱ्यांच्या वेदना प्रभावीपणे व्यक्त झाल्या. 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी सामाजिक शोषणव्यवस्थेचे स्वरूप उघड केले. त्यांच्या लेखणीला केवळ साहित्यनिर्मितीचे साधन न मानता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले पाहिजे.

विधवांचे दुःख, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या आणि समाजातील अनिष्ट प्रथा यांविरुद्धही त्यांनी ठाम भूमिका घेतली. अनाथ आणि निराधार बालकांसाठी त्यांनी आश्रयाची व्यवस्था केली.विधवांच्या प्रश्नांकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर मानवी हक्कांच्या दृष्टिकोनातून पाहिले. स्त्री ही कोणाची तरी मालमत्ता नसून स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, हा आधुनिक विचार त्यांनी आपल्या कृतीतून मांडला.त्यांच्या विचारांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ भाषणे केली नाहीत, तर स्वतःच्या जीवनात त्या विचारांची अंमलबजावणी केली.आज महात्मा फुले यांच्या विचारांचे स्मरण करताना वर्तमान समाजव्यवस्थेचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीने जग जवळ आले, शिक्षणाचा विस्तार झाला, संविधानाने समानतेचा अधिकार दिला; मात्र जातीय विद्वेष, सामाजिक विषमता, स्त्री-पुरुष असमानता, अंधश्रद्धा, शैक्षणिक दरी आणि आर्थिक शोषणाचे प्रश्न आजही पूर्णपणे संपलेले नाहीत. शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी शिक्षणातून विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी निर्माण होते आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेला समाज घडवायचा असेल, तर शिक्षण केवळ नोकरी मिळविण्याचे साधन न राहता माणूस घडविण्याची प्रक्रिया बनली पाहिजे. शाळा-कॉलेजांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये, स्त्रीसन्मान, सामाजिक समरसता आणि बंधुभाव यांचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजवले पाहिजेत. शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या श्रमांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे.जाती-धर्माच्या भिंतींपलीकडे जाऊन माणसातील माणूसपण जपण्याची संस्कृती विकसित झाली पाहिजे. हीच महात्मा फुले यांच्या विचारांना वाहिलेली खरी आदरांजली ठरेल.२८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांचे निधन झाले; परंतु त्यांनी पेटवलेली सामाजिक परिवर्तनाची मशाल आजही तेवत आहे. त्यांच्या कार्याला अभिवादन करणे म्हणजे केवळ प्रतिमेला हार अर्पण करणे नव्हे, तर त्यांच्या विचारांचा स्वीकार करून आपल्या आचरणात समता, न्याय आणि विवेक रुजविणे होय.महात्मा फुले यांनी समाजाला दिलेला सर्वांत मोठा संदेश हाच की, माणसाची ओळख त्याच्या जन्मावरून नव्हे, तर त्याच्या कर्तृत्वावरून आणि माणुसकीवरून ठरली पाहिजे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे ही आजच्या पिढीची सामाजिक जबाबदारी आहे.

समतेचा विचार कृतीत उतरला, शिक्षणाची संधी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली आणि प्रत्येक माणसाला सन्मानाने जगता आले, तरच फुले यांचे स्वप्न साकार होईल.महात्मा फुले हे एका कालखंडाचे समाजसुधारक नव्हते; ते समताधिष्ठित भविष्याचे शिल्पकार होते.म्हणूनच ते आजही समाजक्रांतीचे अध्वर्यू आणि परिवर्तनाच्या वाटेवरील अखंड प्रेरणास्रोत आहेत.क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना विनम्र अभिवादन!

**पंडित पवळे**
नांदेड.

# महार-मांग संघर्षाचा ऐतिहासिक दस्तावेज;बाबासाहेबांच्या व्यापक नेतृत्वाचा वेध

## संविधान दिनी महार-मांग जातीतील अंतर्गत संघर्ष:एक ऐतिहासिक दस्तावेज ग्रंथाचे प्रकाशन

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून महार-मांग जातीतील अंतर्गत संघर्ष : एक ऐतिहासिक दस्तावेज या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार रामप्रसाद खंडेलवाल यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. राजू मधुकरराव सोनसळे आणि कपिल कांतराव सरोदे यांनी संकलित व संपादित केलेल्या या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सिद्धोधन कांबळे होते.

या वेळी भन्ते पय्याबोधी थेरो, प्रतीक मोरे, डॉ. श्रीहरी कांबळे, सुभाषदादा काटकांबळे, नंदकुमार बनसोडे, सुखदेव चिखलीकर, शरद सूर्यवंशी, राहुल चिखलीकर,माधव चित्ते, दिलीपदादा जोंधळे यांच्यासह आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्ते, अभ्यासक आणि पत्रकार उपस्थित होते.प्रकाशन सोहळ्याचे उद्घाटक रामप्रसाद खंडेलवाल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केला. महार-मांग समाजातील ऐतिहासिक संबंध, मतभेद आणि संवादाचे प्रयत्न समजून घेण्यासाठी या ग्रंथातील भाषणे, पत्रव्यवहार आणि तत्कालीन भूमिका महत्त्वपूर्ण ठरतील, असे त्यांनी सांगितले. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर समाजातील ऐतिहासिक गैरसमज दूर करण्यासाठी अशा दस्तऐवजांचा अभ्यास उपयुक्त ठरू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

### बाबासाहेबांचे नेतृत्व एका जातीपुरते मर्यादित नव्हते:डॉ. राजू सोनसळे

या ग्रंथाच्या निर्मितीमागील भूमिका स्पष्ट करताना डॉ. राजू सोनसळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व कोणत्याही एका जातीपुरते किंवा समुदायापुरते मर्यादित नव्हते, असे प्रतिपादन केले. अस्पृश्य समाजातील विविध जाती-जमातींच्या प्रश्नांकडे बाबासाहेबांनी सामाजिक न्यायाच्या व्यापक भूमिकेतून पाहिले. स्वाभिमान, शिक्षण, संघटन, राजकीय हक्क, सामाजिक समता आणि मानवी प्रतिष्ठा ही त्यांच्या चळवळीची मूलभूत मूल्ये होती, असे त्यांनी स्पष्ट केले.

या ग्रंथात समाविष्ट असलेला १९४१ मधील देविदास नामदेवराव कांबळे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील पत्रव्यवहार तत्कालीन अस्पृश्य समाजातील अंतर्गत सामाजिक अंतर, परस्पर अविश्वास, प्रतिनिधित्वाची आकांक्षा आणि स्वतंत्र सामाजिक अस्मितेचे प्रश्न समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज असल्याचे सोनसळे यांनी सांगितले. या पत्रव्यवहारातील आरोप आणि अनुभव हे तत्कालीन पत्रलेखकाने मांडलेले वास्तव म्हणून समजून घेतले पाहिजेत; त्यांना संपूर्ण समाजाचे सार्वत्रिक मत मानता येणार नाही, अशी चिकित्सक भूमिका त्यांनी मांडली.




बाबासाहेबांनी आपल्या उत्तरातून आपण केवळ महार समाजाचे नेते नसून व्यापक अस्पृश्य समाजाच्या राजकीय आणि सामाजिक हक्कांसाठी कार्यरत असल्याचे स्पष्ट केले. स्वतंत्र मजूर पक्षाची भूमिका कोणत्याही एका जातीपुरती मर्यादित नव्हती. तसेच स्वतंत्र सामाजिक अस्मितेचा सन्मान राखतानाच व्यापक सामाजिक मुक्ती आणि एकजुटीची दिशा कायम ठेवली पाहिजे, हा बाबासाहेबांच्या विचारांचा महत्त्वाचा पैलू असल्याचे सोनसळे यांनी अधोरेखित केले. सकटांचा संघ या लेखातून अस्पृश्य समाजातील महार, मांग, चांभार, ढोर, भंगी आदी जातींमधील अंतर्गत भेदभाव दूर करण्याच्या प्रयत्नांची माहिती मिळते. के. के. सकट यांनी अस्पृश्य समाज समतासंघाच्या माध्यमातून रोटी-बेटी व्यवहार आणि सामाजिक समानतेसाठी केलेले प्रयत्न या संदर्भात महत्त्वाचे आहेत. अंतर्गत जातिभेद दूर करणे आवश्यक असले तरी केवळ अंतर्गत एकजुटीने बाह्य अस्पृश्यतेची व्यवस्था संपणार नाही; त्यासाठी संघटित संघर्ष आणि अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध ठोस कृती आवश्यक आहे, हा बाबासाहेबांच्या लेखनाचा आशय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इतिहासातील मतभेदांचा उपयोग वर्तमानात द्वेष निर्माण करण्यासाठी न करता त्यांची कारणे समजून घेण्यासाठी झाला पाहिजे. सामाजिक एकजूट म्हणजे एका जातीचे दुसऱ्या जातीवर वर्चस्व नव्हे; प्रत्येक घटकाला समान अधिकार, प्रतिष्ठा आणि स्वाभिमान मिळाल्याशिवाय खरी एकजूट निर्माण होऊ शकत नाही. इतिहासाचे चिकित्सक आकलन करून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांवर आधारित सामाजिक ऐक्य निर्माण करणे, हाच या ग्रंथाचा मुख्य उद्देश असल्याचे डॉ. सोनसळे यांनी सांगितले. भन्ते पय्याबोधी थेरो यांनी १९४१ मधील डॉ.आंबेडकर आणि देविदास कांबळे यांच्यातील पत्रव्यवहाराचा संदर्भ देत बाबासाहेबांची स्पष्टवक्तेपणा आणि नेतृत्वाची जबाबदारी अधोरेखित केली. वंचित समूहांनी घटनात्मक अधिकारांविषयी जागरूक राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.प्रतीक मोरे यांनी २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणासंदर्भात दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर या ग्रंथाची निर्मिती झाल्याचे सांगितले. कपिल सरोदे यांनी ऐतिहासिक घटनांचा तत्कालीन संदर्भ समजून घेण्याची गरज व्यक्त केली. विरोधी मते ऐकून घेणे आणि त्यांना उत्तर देणे ही बाबासाहेबांच्या लोकशाही विचारपद्धतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये होती, असे त्यांनी नमूद केले.मूळ पत्रव्यवहार आणि लेखन ऐतिहासिक संदर्भांसह वाचकांसमोर उपलब्ध करून देणे, तसेच त्यावर चिकित्सक आणि विधायक चर्चा घडवून आणणे हा या ग्रंथाच्या संकलन-संपादनामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# माहूर येथे २६/११ च्या शहीद वीर जवानांना अभिवादन

माहूर/प्रतिनिधी-मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात देशाचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर जवानांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी माहूर येथे नगरध्यक्ष फिरोज दोसानी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे माहूर तालुकाध्यक्ष मेघराज जाधव यांनी शहीदांना सलाम हा श्रद्धांजलीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शहीद जवानांच्या शौर्याचे स्मरण करून त्यांच्या बलिदानाला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ पत्रकार कादर दोसानी, जयकुमार अडकिणे, एस. एस. पाटील, उपनगराध्यक्ष नाना लाड, नगरसेवक राजू सौंदळकर, मेघराज जाधव, डी. डी. चव्हाण सर, निवृत्त पोलीस अधिकारी राठोड, राज ठाकूर, अपील बेलखोडे, सुमित खडसे, इरफान सय्यद, रफिक सौदागर, सैफ दोसानी आदी सह अनेकांनी उपस्थित राहून शहीदांना अभिवादन केले. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या आठवणींना उजाळा दिला. मुंबईवरील त्या भ्याड हल्ल्यात दहशतवाद्यांशी दोन हात करताना मुंबई पोलीस दलातील अधिकारी व जवानांसह सुरक्षा यंत्रणेतील अनेक वीरांनी देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले. संकटाच्या क्षणी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या या शूरवीरांचे शौर्य प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी सीमेवर तसेच देशांतर्गत सुरक्षेसाठी अहोरात्र तत्पर असलेल्या जवानांच्या त्यागाची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. शहीदांचे बलिदान केवळ स्मरणापुरते मर्यादित न राहता त्यांच्या आदर्शांनुसार देशसेवेची भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे, असा संदेशही यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एस. पाटील सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार माहूर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांनी मानले.



सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# दुष्काळी परिस्थितीच्या उपाययोजनांसाठी नांदेड जिल्हा प्रशासन सज्ज

## २४ तास कार्यरत वॉर रूम स्थापन

नांदेड/प्रतिनिधी-चालू वर्षी अल-निनोच्या प्रभावामुळे जिल्ह्यात अनियमित पर्जन्यमान झाले असून, ३१ ऑक्टोबर २०२६ अखेर सरासरीच्या केवळ ६६.९० टक्के पाऊस झाला आहे. परिणामी भूजल पातळीत घट झाली असून जिल्ह्यातील सर्व १६ तालुके दुष्काळसदृश घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाई, चारा टंचाई, जलसंधारणाची कामे, शेतकरी कर्जमुक्ती योजना तसेच विविध उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात २४ तास कार्यरत राहणारा वॉर रूम (मध्यवर्ती नियंत्रण कक्ष) स्थापन करण्यात आला आहे.

या नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून पाणीटंचाई, चारा टंचाई, जलसंधारण आणि कर्जमुक्ती योजनेसंदर्भातील कामकाजाचा समन्वय साधण्यात येणार आहे. यासाठी पाच विशेष कक्ष स्थापन करून अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.पाणीटंचाई, चारा टंचाई व कर्जमुक्ती योजना तक्रार निवारण कक्षामार्फत टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना मंजुरी, टँकर सुरू करणे, विहिरी व बोअरवेल अधिग्रहण तसेच कर्जमुक्ती योजनेचा आढावा घेण्यात येणार आहे. या कक्षाचे प्रमुख संजय नागमावाड आहेत. जलसंधारण कक्षामार्फत तलावातील गाळ काढणे, नाला सरळीकरण व रुंदीकरण, सिमेंट नाला बांध, गॅबियन बंधारे, जलयुक्त शिवार, शेततळी व क्षेत्र उपचाराची कामे राबविण्यात येणार असून, किशोर कुऱ्हे यांच्याकडे या कक्षाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान कक्षामार्फत विविध योजनांची माहिती संकलित करून ॲपवर अपलोड करणे, टँकरच्या जीपीएस यंत्रणेवर देखरेख ठेवणे व आवश्यक सादरीकरण तयार करण्याचे काम केले जाणार आहे. या कक्षाचे प्रमुख प्रदीप डुमणे आहेत. प्रसारमाध्यम कक्षामार्फत दुष्काळ व टंचाईसंदर्भातील बातम्यांचे संकलन, उपाययोजनांची माहिती आणि जनजागृतीसाठी प्रसिद्धीपत्रके जारी करण्यात येणार आहेत. या कक्षाची जबाबदारी नयना कुलकर्णी व चंद्रकांत कारभारी यांच्याकडे देण्यात आली आहे. तसेच २४ तास कार्यरत तक्रार निवारण कक्षामार्फत नागरिकांच्या तक्रारींची नोंद घेऊन संबंधित विभागाकडून त्याच दिवशी तातडीने कार्यवाही करून घेतली जाणार आहे. या कक्षाचे प्रमुख किशोर कुऱ्हे व बारकुजी मोरे आहेत. दुष्काळ, पाणीटंचाई, चारा टंचाई व जलसंधारणा संदर्भातील तक्रारी नोंदविण्यासाठी तसेच अधिकृत माहिती मिळविण्यासाठी नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १०७७ किंवा दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२३५०७७ यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. नियंत्रण कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही उपस्थित राहून कामकाज करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# अवैध रेती वाहतूकी विरोधात पोलिसांची धडक कारवाई

मांडवी/प्रतिनिधी-खंबाळा पैनगंगा नदीपात्रातून रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत सुरू असलेल्या अवैध रेती उपसा याची माहिती मांडवी पोलीसांना मिळताच दि.२७ नोव्हेंबर रोजी धडक कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर-ट्रॉली पकडले. या कारवाईत पोलिसांनी एकूण ३ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन आरोपी विरोधात मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर गायकवाड हे आपल्या पथकासह पेट्रोलिंग करत होते. या पथकात पोहेकॉ. पिसाळ, पोकॉ.श्याम माने, रवी कोडमवार, मनीष ठाकरे, कणकावार आणि जोंधळे यांचा समावेश होता. गस्तीदरम्यान, मौजे खंबाळा शिवारातीलजिल्हा परिषद शाळा (दुर्गापेठ) येथील सार्वजनिक रोडवर त्यांना एक रेतीने भरलेले ट्रॅक्टर संशयास्पदरीत्या जाताना आढळून आले. पोलिसांनी ट्रॅक्टर चालकास रेती वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान चालक दिनेश दामा राठोड (३८) रा. खंबाळा, ता. किनवट याने पैनगंगा नदीपात्रातून अवैधरित्या रेती उपसा केल्याचे उघड झाले. शासनाचा महसूल बुडवून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ही रेती चोरून विक्रीसाठी नेली जात होती. याप्रकरणी मांडवी पोलीस स्टेशनमध्ये चालक व गाडीमालक या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस जमादार प्रकाश अस्वले हे करत आहेत.

# अण्णाभाऊ साठे पुतळा ते आयटीआय मार्गावरील अतिक्रमण धारकांवर कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व शहर वाहतूक शाखेच्या वतीने शुक्रवारी अण्णाभाऊ साठे चौक ते आयटीआय या मार्गावरील अतिक्रमण हटविण्यात आले. तसेच नियमाचे उल्लंघन करणाऱ्या ५७ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.



शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक व शहर वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी बुधवारी सदरील मार्गावर नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक व अतिक्रमण धारकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. पोलीसांनी रस्त्यालगत असलेले हातगाडे, फळविक्रेते, टपऱ्या व वाहतुकीस अडथळे आणणारे साहित्य हटविण्यात आले. चुकीच्या पध्दतीने व नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवरही पोलीसांनी कारवाई केली. वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या ५७ जणांवर दंडात्मक कारवाई करुन ४१ हजार रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

# माधव पावडे यांच्यासह सहा जणांची निर्दोष मुक्तता

नांदेड/प्रतिनिधी-मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून २००८ मध्ये संभाजी ब्रिगेडचे तात्कालीन जिल्हा अध्यक्ष माधव पावडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आंदोलन केले होते.



या आंदोलना दरम्यान काही जणांनी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे वाहन जाळण्यात आले. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात माधव पावडे, रुपेश पावडे, राम पावडे, उद्धव पावडे, यशवंत लोखंडे, गजानन पावडे, गोविंद किरकन याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. पोलीसांनी गुन्ह्याचा तपास करुन माधव पावडेसह सहा जणांविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले होते. न्यायालयाने पुराव्या अभावी दि.२७ नोव्हेंबर रोजी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपींची बाजू न्यायालयात ॲड.बालाजी शिरफुले यांनी मांडली.

## बसस्थानकातून महिलेचे मंगळसूत्र लंपास

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील मुख्य बसस्थानकातून एका महिलेचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना मंगळवारी घडली आहे.

माळाकोळी येथील उषाताई प्रकाश तिडके (वय ५६) ह्या मंगळवारी दुपारी नांदेड शहरातील मुख्य बसस्थानकातून माळाकोळीला जाण्यासाठी बसमध्ये चढत असतांना अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत उषाताई यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरुन नेले आहे. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गावठी पिस्टल व काडतुस बाळगणाऱ्या दोन जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-गावठी पिस्टल व दोन जीवंत काडतुस विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन जणांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी शुक्रवारी जानापुरी परिसरातून अटक केली आहे.

नांदेड जिल्ह्यात अवैध गावठी पिस्टल खरेदी व विक्री करणाऱ्या विरुध्द जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन कारवाईचे सत्र सुरु आहे. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी फौजदार मिलिंद सोनकांबळे व पोलीस कर्मचारी सोनखेड परिसरात पेट्रोलिंग करीत होते. गुप्त बातमीदाराने माहिती दिली की, जानापुरी शिवारात दोन तरुण गावठी पिस्टल विक्रीसाठी थांबलेले आहेत. पोलीसांनी लगेच जानापुरी परिसरात जावून अरबाज उर्फ पटेल मोहम्मद साब शेख (वय २७) रा.सोनखेड व शेख वाजीद उर्फ सरदार शेख उमर (वय २६) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची



अंगझडती घेतली असता आरोपी जवळ एक गावठी पिस्टल व दोन जीवंत काडतुस आढळून आले. पोलीसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून सदरील गावठी पिस्टल हे मध्यप्रदेशातून खरेदी केल्याचे शेख वाजीद याने सांगितले. याप्रकरणी सोनखेड पोलीस ठाण्यात दोन जणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैध सावकारी करणाऱ्या विरुध्द गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-अवैध सावकारी करणाऱ्या एका जणांविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिध्दार्थ कचरु गोडबोले रा.देगावचाळ,नांदेड याने विजयनगर येथील ज्ञानेश्वर विठ्ठलराव कदम यांच्याकडून ५० हजार रुपये व्याजाने प्रतिदिन ५०० रुपये प्रमाणे घेतले होते. सिध्दार्थ गोडबोले याने मुद्दल व व्याज मिळून ७० हजार रुपयांची परतफेड ज्ञानेश्वर कदम यांची केली. तरीही सिध्दार्थ गोडबोले यांच्याकडे १ लाख २० हजार रुपये येणे बाकी आहे. असे म्हणून पैशाचा तगादा कदम यांनी सुरु केला होता. या प्रकरणी गोडबोले यांनी सहकार विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेवून चौकशी करण्यात आली. ज्ञानेश्वर कदम हे अवैध सावकारी करीत असल्याचे निष्पन्न झाले. सहकार अधिकारी मारोती येवते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात ज्ञानेश्वर कदम विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# किनवट येथे भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा

किनवट/प्रतिनिधी-२६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर किनवट शहरात संविधान स्तंभावर प्रतिज्ञेचे पठण करण्यात आले. यावेळी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन आणि सामूहिक प्रतिज्ञा पठणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थितांनी संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांचे रक्षण करण्याचा संकल्प केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले. या प्रसंगी पोलीस निरीक्षक जगदीश मंडळवार यांच्यासह दादाराव कयापक, विवेक ओंकार, मारोती मुनेश्वर, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, ॲड.मिलिंद सर्पे, संदिप निखाते, संतोष सिसले, सय्यद अनवर, शेख सरफराज, फारुख चव्हाण, शेख फय्याज, शेख वसीम, नरेंद्र नरवाडे, शेख फाईम, अशोक शिंगणकर,



चाऊस युनूस, गंगाधर कदम, माधव कावळे, प्रा.रविकांत सर्पे, विजय माघमारे, ॲड. हरिभाऊ दर्शनवाड, राजेश पाटील, नामदेव चिकाटे, साहेब वाढवे, प्रज्ञानंद वाघमारे, शिवन्ना कलगोटूवार, शेख फसीभाई, एन.एस.गायकवाड, शेख मोसीम, विनोद मुनेश्वर, सुनिल कांबळे, भिमराव पाटील, गौतम येरेकर व इतरांची उपस्थिती होती.




दावनगीर ता.देगलूर येथे पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी ग्रामस्थांशी एका कार्यक्रमात संवाद साधुन त्यांच्या समस्यांविषयी चर्चा केली. यावेळी पोलीस अधिकारी व दावणगीर येथील प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते.

# पंचशील विद्यालयात ग्यानोबाराव वाठोरे यांना अभिवादन

हदगाव/प्रतिनिधी-शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेचे माजी अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांत्तर सोहळ्याचे साक्षीदार दिवंगत ग्यानोबाराव वाठोरे (आबा) यांना दुतीय पुण्यस्मरणदिना निमित्त पंचशील शाळेत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले,संचालक जगदीश कदम, मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर,पर्यवेक्षक बेलकुंडे,परीक्षा प्रमुख ओमकार मुधोळ, संदिप ढोले सह आदी शिक्षक बंधू भगिनींनी दिवंगत वाठोरे आबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. अभिवादन सभेत दिवंगत वाठोरे आबा यांच्या कार्याला मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी उजाळा दिला. तालुक्यातील त्यांच्या हरडफ गावात ही पुण्यस्मरण दिनानिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती या ठिकाणी आदर्श विद्यार्जन मंडळाचे सचिव सुनील सोनुले, संचालक जगदिश कदम, कृष्णा पवार, कृष्णा तांबारे यांनी उपस्थिती नोंदवून दिवंगत वाठोरे आबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

# महामार्गावरील धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात;उपाययोजना करण्याची संभाजी ब्रिगेडची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर ते उदगीर या एनएच-६३ (रेणापूर हायवे) रस्त्याच्या बांधकामामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूळ आणि वायुप्रदूषण होत असून नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि शेतकरी त्रस्त झाले आहेत. या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

या महामार्गाचे तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा दोन दिवसांत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे देगलूर तालुकाध्यक्ष शहाजी विठ्ठलराव बाबरे यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. देगलूर ते करडखेड दरम्यान सुरू असलेल्या महामार्गाच्या बांधकामात धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. रस्त्यावर साचलेली माती आणि खडी वाहनांच्या वर्दळीमुळे उडत असल्याने परिसरात धुळीचे लोट पसरत आहेत. यामुळे नागरिकांना श्वसनाचे विकार, डोळ्यांची जळजळ आणि ॲलर्जीचा त्रास होत आहे. शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि रुग्णांनाही याचा मोठा फटका बसत आहे. दुकाने आणि व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये धूळ साचत असल्याने व्यापारावरही परिणाम होत आहे. याशिवाय रस्त्या लगतच्या शेतजमिनीवरील पिकांवर धुळीचा थर साचत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. बाधित शेतकऱ्यांचा सर्व्हे करून पिकांना नुकसान भरपाई द्यावी, रस्त्यावर नियमित पाणी मारावे, धूळ नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात आणि रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.प्रशासनाने दोन दिवसांत ठोस कार्यवाही न केल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. यातून उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाला प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही बाबरे यांनी दिला आहे.

# चाणक्य ट्रॅव्हल्समुळे किनवट-गोकुंदा महामार्ग बनला मृत्यूचा सापळा




किनवट/प्रतिनिधी-किनवट आणि गोकुंदा दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर 'चाणक्य ट्रॅव्हल्स' उभ्या करून सार्वजनिक वाहतूकीची कोंडी केली जात आहे. रस्त्यावर गाड्या उभ्या केल्याने रस्ता अरुंद झालाय. आज (२८ नोव्हेंबर) दुपारी एका दुचाकीचा अपघात झाला असून नशिब बलवत्तर म्हणून एका बालकाचा प्राण वाचला, हे विशेष. आरटीओ आणि पोलीस प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तात्काळ लक्ष न दिल्यास त्याच ठिकाणी अपघात होऊन लोकांना जीवाला मुकावे लागणार का? असा अनेकांनी संतप्त सवाल केला आहे.

किनवट पोलीसांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे शहरातील अवैध धंद्यांपेक्षा अवैध वाहतूक आणि मालवाहतूक करणारे बारा, चौदा, सोळा टायरी ट्रक, ट्रॉली ऑटोरिक्षे आणि चाणक्य ट्रॅव्हल्स सार्वजनिक आम रस्त्यावर उभ्या केल्या जातात. जवळपास चाळीस फूट रुंद रस्त्याचे सीसीकरण केलेला राष्ट्रीय महामार्ग आहे. त्यातच रस्त्यात चाणक्य ट्रॅव्हल्स गाड्या उभ्या केल्या जातात. किनवट ते गोकुंदा संपर्काचा हा एकमेव प्रमुख मार्ग असल्याने अमाप वाहतूक वर्दळ असते. रस्त्यात मोठी वाहने उभी केल्याने वाहतूकीची कोंडी आणि अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मागच्या महिन्यात दिवंगत ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकरांचे याच मार्गावर अपघाती निधन झाल्यानंतरही किनवट पोलीसांनी बोध घेतलेला नाही म्हणून लोकांना पुन्हा पुन्हा अपघाताचा शिकार व्हावे लागत आहे. आणखी किती अपघात आणि किती जणांचे बळी गेल्यानंतर किनवट पोलीस अशा वाहनांवर कारवाई करणार?, की कारवाईच करणार नाही? असा नागरिकांचा सवाल आहे. किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवारांना या अपघाताची माहिती दिल्यानंतरही तात्काळ पोलीस घटनास्थळी पोहोचतील अशी धारणा होती परंतु दिड तासानंतरही पोलीस फिरकला नव्हता, यावरुनच पोलीसांना प्रकरणाचे गांभीर्य दिसत नाही, हे अगदी स्पष्ट झाले आहे.

# गांजा विक्री करणाऱ्या एका आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील नईआबादी भागात गांजा विक्री करणाऱ्या एका आरोपीस शुक्रवारी शिवाजीनगर पोलीसांनी अटक केली असून त्याच्या जवळून २५ हजार रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात अंमली पदार्थ व नशेचे साहित्य विक्री करणाऱ्या विरुध्द कारवाईची मोहिम सुरु केली आहे. नईआबादी भागातील दातार चौकात एक इसम गांजा विक्री करीत असल्याची माहिती शिवाजीनगर पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक राजेश पुरी, फौजदार इरफान सय्यद व पोलीस कर्मचाऱ्यांनी दातार चौकातील भाजीमंडी परिसरातून मोहम्मद इसाक मो.युसुफ (वय ४५) रा.नईआबादी, नांदेड यास अटक केली. त्याच्या जवळून २५ हजार रुपये किंमतीचा सव्वा किलो गांजा पोलीसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी विरुध्द एनडीपीसी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# सत्ता काबीज करण्याचा भाजपचा डाव;खर्गेंचा गंभीर आरोप!

नवी दिल्ली: मतदारसंघ पुनर्रचना अर्थात डिलिमिटेशन विधेयक म्हणजे सत्ता काबीज करण्याचा भाजपचा डाव आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्यसभा खा.मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला.

देशातील राजकीय वातावरण तापले असून, इंडिया आघाडीने या विधेयकाला कडाडून विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे. बैठकीनंतर बोलताना मल्लिकार्जुन खर्गे यांनी डिलिमिटेशन विधेयक हे लोकशाहीसाठी घातक असल्याचा आरोप केला. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा देशातील संपूर्ण सत्ता आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न असल्याचा दावा त्यांनी केला. यापूर्वी चारसो पारची घोषणा करणारे आता आठसो पार म्हणतील आणि एकदा संपूर्ण सत्ता मिळाल्यानंतर संविधान बदलण्याचा प्रयत्न करतील, असा आरोप खर्गे यांनी केला. भाजप आणि संघाच्या हातात संपूर्ण सत्ता गेल्यास मनुस्मृती पुन्हा आणण्याचा धोका असल्याचेही ते म्हणाले. डिलिमिटेशनच्या प्रस्तावात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या प्रतिनिधित्वाचा योग्य विचार करण्यात आलेला नसल्याचा आक्षेप खर्गे यांनी घेतला. लोकसंख्येच्या तुलनेत एससी/एसटी प्रवर्गाच्या जागांमध्ये अपेक्षित वाढ होत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. २०२६ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या आधारे या जागांचे पुनर्निर्धारण व्हायला हवे, अशी मागणीही त्यांनी केली.

# जि.प.हायस्कूलच्या विंधन विहिरीची मोटार व केबल वायर चोरीला

किनवट/प्रतिनिधी-किनवट स्थित जिल्हा परिषद हायस्कूल (मुलांचे) च्या प्रांगणातील विंधन विहिरीतील विद्युत मोटरीसह विद्युत वाहक केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची बाब २६ नोव्हेंबर रोजी मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी किनवट पोलीसात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केल्याचे वृत्त आहे. राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेल्या भरवस्तीतील चोरीने प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

किनवट येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेच्या प्रांगणात असलेल्या विंधन विहिरीतील विद्युत पंपासह विद्युत वाहक केबल अज्ञात चोरांनी पळविल्याची घटना २६ रोजी मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आली. त्यावरुन मुख्याध्यापकांनी किनवट पोलीसात धाव घेतली. पोलिसांनी सुद्धा गुन्ह्याची नोंद केली आहे. कदाचित तपासांती लवकरच चोरटे पोलीसांच्या जाळ्यात अडकतील. परंतु शाळा प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असेल तर तेही तेवढेच जिम्मेदार आहेत. शाळा चालू झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे तात्काळ चौकशी करून कारवाई करण्याची मागणी शाळा व्यवस्थापन समितीने केली आहे. किनवट पोलीसात विशेष बाल पोलीस पथक (एसजेपीयू) किंवा बालकल्याण पोलीस अधिकारी कार्यान्वित असतील तर ते गेले कुठे? असा सवाल अशा अल्पवयीन चोरट्यांनी केलेल्या चोऱ्यांच्या घटनांवरून निर्माण होतो. किनवट व गोकुंदा शहरातील बिल्डिंग बांधकामाचे प्रमाण वाढले आहे. काही ठिकाणचे साहित्य चोरीला गेला तरी पोलीसात तक्रार देण्याचे कोणी धाडस दाखवत नसल्याची बाब समोर आली आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील तुषार संचाचे पाईप, नौजलसह विविध साहित्याच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले. शेतकरी सुद्धा पोलीसात तक्रार देण्यास धजत नाही, कारण पोलीस तपासातून साहित्य मिळेल आणि चोरटे सापडतीलच यावर भरोसा नाही. अल्पवयीन चोरट्यांचा बंदोबस्त केला नाही तर त्यांनाही कायद्याची भीती राहणार नाही आणि त्यांच्यात परिवर्तन होणार नाही. किनवट पोलीस ठाण्यात विशेष बाल पोलीस पथक (एसजेपीयू) आणि बालकल्याण पोलीस अधिकारी कार्यान्वित असतील तर त्यांनी अद्याप कोणत्या कारवाया केल्या याबद्दल अनेक जण अनभिज्ञ आहेत. किमान आतातरी या प्रशासनाने बाल गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी लोकांमध्ये विश्वास निर्माण करावा, अशी लोकअपेक्षा वाढीस लागली आहे.




विधान परिषदेचे उपसभापती आ.सचिन अहिर यांनी आ.बालाजी कल्याणकर यांच्या निवासस्थानी आज (शनिवार) सकाळी सदिच्छा भेट दिली. यावेळी कल्याणकर कुटुंबियांच्यावतीने त्यांचा शाल व स्मृती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी आ.बालाजी कल्याणकर, सौ.संध्याताई कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर, गंगाधर बडुरे, उमेश मुंडे, प्रफुल्ल सावंत यांच्यासह इतर उपस्थित होते.

# नगर परिषदेतील कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पाच महिन्यांपासून वेतन थकीत

धर्माबाद/प्रतिनिधी-व्यापारी नगरी म्हणून ओळख असलेल्या धर्माबाद शहराची स्वच्छता राखणाऱ्या नगरपरिषदेचा कारभार सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत करणाऱ्या तब्बल ४५ कंत्राटी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे गेल्या पाच महिन्यांपासून वेतन थकीत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यातच कचरा संकलन करताना आवश्यक सुरक्षा साहित्यही मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कंत्राटदार शेख सलीम यांच्यामार्फत काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे वेतन नेमके का थकले? नगरपरिषदेने कंत्राटदाराची देयके अदा केली आहेत का? वेतन वितरणाची जबाबदारी कोणाची? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पाच महिने वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट ओढवले असून, त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, स्वच्छता कर्मचाऱ्यांना मास्क, हातमोजे, सुरक्षित बूट यांसारखे आवश्यक साहित्य मिळते नाही. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी होते का, याकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचा आरोप होत आहे. शहराचे आरोग्य जपणाऱ्या कर्मचाऱ्यांचेच आरोग्य धोक्यात असेल, तर ही बाब गंभीर आहे. ४५ कर्मचाऱ्यांचे पाच महिन्यांचे वेतन थकीत असताना नगराध्यक्षा, नगरसेवक आणि मुख्याधिकारी यांनी याची दखल घेतली नाही का? कामगारांच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधींचे मौन धारण केले आहे. नगरपरिषदेने तातडीने थकीत वेतन मिळवून द्यावे, कंत्राटदाराच्या भूमिकेची चौकशी करावी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे. अन्यथा शहर स्वच्छ ठेवणाऱ्या कामगारांवरच अन्याय होत असल्याचे चित्र कायम राहणार आहे.

पान १ वरुन

## होय रे भाऊ! खासदारांची...

अकरा महिने! पगार वाढवा म्हटलं तर एजन्सी सांगते, 'बाहेर शंभर जण रांगेत आहेत.' त्या रांगेतून एखादा खासदार का नाही घेत?'' कोपऱ्यात बसलेला सुशिक्षित बेरोजगार पक्या उठला. ''मी पाच वर्षं भरतीची जाहिरात शोधतोय. जाहिरात आली तर परीक्षा नाही, परीक्षा झाली तर पेपर फुटतो आणि निकाल लागला तर नियुक्ती कोर्टात! तोपर्यंत वय निघून जातं. खासदार व्हायला बरं, तिथं निवृत्तीचं वयच नाही!''

अण्णा म्हणाले, ''गणू २००५ नंतर नोकरीला लागला, म्हणून त्याला नवी पेन्शन योजना. मग साहेबांनाही तीच द्या. मानधनातून हप्ता कापा आणि बाजारात लावा. सेन्सेक्स घसरला की साहेबांचा चेहरा घसरला पाहिजे!''भाऊ उठला. ''संसदेत विधेयक आणा, 'आधी शेतकरी, मग भत्तेकरी'. रिक्त पदं भरा, कायम कामाला कायम माणूस द्या, महागाईप्रमाणं पगार द्या आणि काटकसरीची सुरुवात वरच्या खुर्चीपासून करा!''

''पण हे मंजूर कोण करणार?'' बंड्यानं विचारलं.''तेच खासदार!'' शिवा शेतकरी हसला, ''म्हणजे आमच्या पदरात आश्वासन आणि साहेबांच्या ताटात लोकशाहीचं पक्कान्न!''

# राहेरमध्ये दगडी कोळशाची अनधिकृत साठवणूक सुरुच!

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील राहेर येथे मोठ्या प्रमाणात दगडी कोळशाची साठवणूक सुरूच असल्याचे समोर येत आहे. या प्रकरणात ग्रामपंचायतीकडून परवानगी देण्यात आलेली नसल्याची माहिती ग्रामसेवकांनी दिली आहे. कोळशाची साठवणूक सुरू असल्याने महसूल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शेकडो टन दगडी कोळशाचा साठा एका ठिकाणी करण्यात आला असून, यामध्ये पुनर्वापरातील कोळशाचाही समावेश असल्याची माहिती आहे. ट्रकद्वारे कोळशाची वाहतूक करून त्याची उतराई व साठवणूक केली जात आहे. परिसरातील वीटभट्ट्यांसाठी या कोळशाचा इंधन म्हणून वापर होत असल्याची स्थानिक पातळीवर चर्चा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात कोळशाची साठवणूक करण्यासाठी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत काय? कोळसा नेमका कोठून आणला जातो? त्याची वाहतूक, खरेदी-विक्री आणि साठवणुकी संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध आहेत काय? याची तपासणी होणे आवश्यक आहे. दुसरीकडे, खुल्या जागेत मोठ्या प्रमाणात कोळसा साठविल्यामुळे परिसरात धुळीचे प्रदूषण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही प्रत्यक्ष पाहणी करून पर्यावरणविषयक नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करणे गरजेचे आहे. राहेरमधील या कोळसा साठवणूक प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन संयुक्त तपासणी करावी. आवश्यक परवानग्या व कागदपत्रांची पडताळणी करून नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

पान १ वरुन

## डिलिमिटेशनवरुन इंडिया आघाडीत...

महिला आरक्षणाला विरोध नसून त्याच्या अंमलबजावणीच्या नावाखाली मतदारसंघांची पुनर्रचना करण्याच्या प्रक्रियेवर आक्षेप असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. आगामी विशेष अधिवेशनात या विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष होण्याची शक्यता आहे. त्यातच इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या वेगवेगळ्या भूमिकांमुळे विरोधकांच्या एकजुटीचीही परीक्षा होणार आहे.

## पवारांच्या राष्ट्रवादीवर टीकेची...

काँग्रेसमध्ये डिलिमिटेशन विधेयकाच्या मुद्द्यावर रोहित पवार यांनी वैचारिक संघर्ष कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. २०२२ मध्ये अजित पवारांनी वेगळा निर्णय घेतला, तेव्हाही नात्यापेक्षा विचारांना प्राधान्य दिले. आजही आणि उद्याही तीच भूमिका कायम राहील, असे त्यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमधून स्पष्ट केले. रोहित पवारांचे समर्थक विकास लवांडे यांनीही भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेशी कधीही तडजोड करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. पुरोगामी, धर्मनिरपेक्ष विचारधारा आणि संविधानिक मूल्ये सोडणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## महापालिकेची सर्वसाधारण सभा...

येवून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुर्णाकृती पुतळ्याच्या बांधकामा संदर्भात प्रसारमाध्यमांसमोर भूमीका मांडली. विरोधकांकडून फेक निरेटीव्ह पसरवित असल्याचा आरोप त्यांनी केला. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा प्रश्न चांगलाच गाजण्याची शक्यता आहे. विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी प्रभागातील अनेक प्रस्ताव महापौर कविता मुळे यांच्याकडे दिले आहेत. परंतु सदरील प्रस्ताव महापौरांचे प्रतिनिधी संतोष मुळे यांनी बाजुला ठेवले आहेत. त्यामुळे विरोधी पक्षांच्या नगरसेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. शिवाजीनगरमधून आलेलेच प्रस्ताव महापौर सर्वसाधारण सभेत ठेवणार आहेत का? असा सवाल काँग्रेसच्या नगरसेवकांनी केला आहे.

# कै.गं.पो.सब्बनवार विद्यालयाला गजानन कोटलावार यांची सदिच्छा भेट

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कै.गं.पो.सब्बनवार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुंडलवाडी येथे नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या वतीने तसेच शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती कुसुमताई सब्बनवार व संस्था सचिव तथा विद्यमान नगरसेवक डॉ. प्रशांत सब्बनवार यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी नगरसेवक मारोती कोटलावार व नगरसेवक श्रीनिवास गोणेलवार यांचाही संस्थेतर्फे व शाळेतर्फे सत्कार करून सन्मान करण्यात आला. या सदिच्छा भेटी दरम्यान शाळेच्या शैक्षणिक, सामाजिक व विविध उपक्रमांविषयी चर्चा करण्यात आली. मान्यवरांच्या या भेटीमुळे शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक कल्याण गायकवाड प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ चटलूरे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांनी दिलेल्या सदिच्छा भेटीबद्दल संस्थेच्या व शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या



पान १ वरुन

## एमपीडीए अंतर्गत ...

एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. पोलीसांनी तात्काळ चारही आरोपींना स्थानबद्ध करुन त्यांची रवानगी संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे. नोव्हेंबर अखेरपर्यंत पोलीसांनी आतापर्यंत ३५ सराईत गुन्हेगारांना एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध केले आहे. जिल्ह्यातील आणखी दीडशे गुन्हेगार पोलीसांच्या रडारवर असून त्यांच्या विरुध्द कारवाईच्या प्रस्तावाची प्रक्रिया सुरु आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४